**महाराष्ट्र शासन**
विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्‌वाहन निरीक्षक)
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
तिसरा मजला, प्रशासकीय इमारत,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई - ४०००७१.

| | |
|---|---|
| e-mail - **eislbnlift.nrg-mh@gov.in** | दूरध्वनी क्रमांक – **०२२-२५२८५९६७** |
| जा.क्र.विनि(सअमंवउनि)/मु.लि./ ९८७९८ /२०२२ | दिनांक :- ११/११/२०२२ |


प्रति,

अध्यक्ष, अनुज्ञापक मंडळ तथा
मुख्य विद्युत निरीक्षक
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
चेंबुर (पूर्व), मुंबई-७१

**विषय :- अनुज्ञापक मंडळाची सन-२०२२ या वर्षातील " सनदी विद्युत सुरक्षा अभियंता " बाबत बैठकीच्या इतिवृत्त.**

**संदर्भ :-** मा.अध्यक्ष, अनुज्ञापक मंडळ तथा मुख्य विद्युत निरीक्षक, यांचे पत्र जा.क्र.मुविनि/तांत्रिक/ १७६४/२०२२ दि. १०/ ११/२०२२ रोजी दिलेली मंजुरी.

उपरोक्त विषयान्वये अनुज्ञापक मंडळाची दि.१०/११/२०२२ रोजी गुगलमीट व्दारे संपन्न झाली. सदर सभेच्या इतिवृत्ताची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.

सदर इतिवृत्तातील मुद्यांबाबत आपले अभिप्राय/ सुचना इतिवृत्तांत प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत या कार्यालयात पाठविण्यात आपणांस विनंती करण्यात येत आहे.

सोबत : - इतिवृत्ताची प्रत.

( उ.के.धोटे)
विद्युत निरीक्षक
(सचिव, अनुज्ञापक मंडळ व उदवाहन निरीक्षक)
चेंबुर (पूर्व), मुंबई-७१

## महाराष्ट्र शासन

विषयः- सचिव, अनुज्ञापक मंडळ,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने सन-२०२२ मधील अनुज्ञापक मंडळाची आकस्मिक बैठक दिनांक १०/११/२०२२ रोजी संपन्न झाली.

## सदर बैठकीचा इतिवृत्तात

सभेचे स्थळ : गुगलमीट व्दारे दि.१०/११/२०२२ रोजी दुपारी ११.३० वाजता झालेली बैठक.

सकाळी १२.४५ वाजता गणसंख्या पूर्ण झाल्यानंतर सभेची कार्यवाही सुरु करण्यात आली.

### बैठकीस उपस्थित असलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष, अनुज्ञापक मंडळ तथा मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मुंबई | श्री.दि.ज.खोंडे |
| २. | सदस्य,अधीक्षक अभियंता, औरंगाबाद प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, औरंगाबाद | |
| ३. | अधीक्षक अभियंता मुंबई प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई | : श्री.अ.ग.कणसे |
| ४. | सदस्य, अधीक्षक अभियंता, पुणे प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, पुणे | : श्रीमती मिनाक्षी वाठोरे |
| ५. | सदस्य, अधीक्षक अभियंता, नागपूर प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, नागपूर | : श्री.प्र.व.चामट |
| ६. | सदस्य, सचिव,विद्युत निरीक्षक (सचिव,अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक),मुंबई | : श्री.उ.के.धोटे |
| ७. | सदस्य, राज्य तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई | : अनुपस्थित |
| ८. | सदस्य, वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था, मुंबई | : एच.बी.चौधरी |
| ९. | सदस्य, टाटा पॉवर कंपनी लिमीटेड | : श्री.विकास गवळी |
| १०. | सदस्य, म.रा.वि.वि.कं.मर्या.,मुंबई | : अनुपस्थित |
| ११. | सदस्य, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम मुंबई | : जी.जी.चंदनकर |
| १२. | सदस्य, अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेड | : दामोदर सहस्त्रबुद्दे |
| १३. | सदस्य, मध्य रेल्वे मुंबई | : अनुपस्थित |
| १४. | सदस्य, महाराष्ट्र विद्युत ठेकेदार संघटना, मुंबई | : श्री.अमर पाटील |
| १५. | सदस्य, दि इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन, नागपूर | : श्री.आर.पी.देशमुख |
| १६. | अध्यक्ष, फेकॅम पूणे (विशेष निमंत्रित) | : श्री.मोहन जायले पाटील |

सर्व प्रथम सचिवांनी मा.अध्यक्ष, तसेच अनुज्ञापक मंडळाचे सर्व उपस्थित सदस्य व निमंत्रित यांचे स्वागत केले.

**<u>विषय क्र.१</u> : " सनदी विद्युत सुरक्षा अभियंता " परिक्षा कार्यपध्दतीबाबत चर्चा करणे.**

सनदी विद्युत सुरक्षा अभियंता परीक्षा कार्यपध्दतीबाबतीत दि.१०.११.२०२२ रोजी अनुज्ञापक मंडळाचे बैठकित चर्चा करण्यात आली.सनदी विद्युत सुरक्षा अभियंता यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने व वर्ष २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमधील पास होणाऱ्या उमेदवारांची संख्या व फक्त एकच उमेदवारास प्रमाणपत्र देण्यात आल्याने परीक्षा पध्दतीमध्ये बदल करण्याचे अनुषंगाने खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

१) अधीक्षक अभियंता, नागपूर यांनी माहे डिसेंबर-२०२१ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा पेपर हा सैध्दांतिक (Therotical) होता त्यामध्ये सुधारणा करुन अनुभव (Practical) आधारीत करावा असे सूचविले.

२) फेकॅम प्रतिनिधी (विशेष निमंत्रित) यांनी व अधीक्षक अभियंता, नागपूर यांनी वजा गुणांची (Negative Marking) पध्दत बंद करण्याची शिफारस केली. यावरती अध्यक्ष, अनुज्ञापक मंडळ यांनी लोकसेवा आयोग (MPSC) मध्ये वजा गुणांची पध्दत असल्याचे सांगितले तसेच वजा गुणांची पध्दत बंद केल्यास स्पर्धात्मक परीक्षा होणार नाही असे सांगितले.

३) अधीक्षक अभियंता, मुंबई व बीईएसटी (बेस्ट उपक्रम) चे प्रतिनिधी यांनी चुकीच्या उत्तरांना (१/४) पध्दत अवलंबावी तसेच उत्तीर्ण होण्याकरीता ५० गुणांपेक्षा कमी गुण ठेवावे असे सूचविले.

४) ई-कॅम प्रतिनिधी यांनी वजा गुणांची पध्दत (१/६) ठेवावी असे सुचविले यावरती विदर्भ कंत्राटदार संघाचे प्रतिनिधी व फेकॅम प्रतिनिधी (विशेष निमंत्रित) यांनी वजा गुणांची पध्दत काढून टाकावी असे सुचविले.

५) दि.११.१२.२०२२ रोजी होणाऱ्या सनदी विद्युत सुरक्षा अभियंता परिक्षेमध्ये जास्तीत जास्त उमेदवारांनी सहभाग घ्यावा यासाठी विविध माध्यमांव्दारे जागृतता करावी तसेच महावितरण,बी.ई.एस.टी,अदानी इलेक्ट्रीसिटी,टाटा पॉवर,इ. वितरण कंपन्यांनी तसेच विद्युत ठेकेदार संघटना यांनी सदर परिक्षेबाबत प्राधान्याने आपल्या स्तरावर प्रसिध्दी दयावी असे अध्यक्ष अनुज्ञापक मंडळ यांनी सुचविले.

या सर्व बाबींवर चर्चा केल्यानंतर चर्चेअंती सद्य:स्थितीतील (१/३) गुणांची वजा पध्दत बदलून (१/५) गुणांची वजा पध्दत अवलंबावी व यास कोणाची हरकत नसावी असे अध्यक्ष, अनुज्ञापक मंडळ यांनी सूचविले यावरती एकमताने सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मान्य/ अमान्य

(दि. जं. खोंडे)
अध्यक्ष, अनुज्ञापक मंडळ तथा
मुख्य विद्युत निरीक्षक
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
चेंबुर (पूर्व), मुंबई-७१

जा. क्र./मुविनि/तांत्रिक/७७६४/2022
10 NOV 2022

(उ.के.धोटे)
विद्युत निरीक्षक
(सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक)
चेंबुर (पूर्व), मुंबई-७१

E:\Exam-May-2019\CESE Meeting Dt.10.11.2022 - Copy.Docx